# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२२ - २२७१७५०० <br> फॅक्स - ०२२ - २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा. क्र. राआसो /आयुष/कोविड-१९ आयुष औषधी/ २०२००६-२१३०८ /२०

दिनांक-२४/०७/२०२०

प्रति,

जिल्हाधिकारी ................................(सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

**विषयः- कोविड-१९ अनुषंगिक आयुष औषधी, स्थानिक निधीतून खरेदी करणेबाबत.**

संदर्भः- १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/जिवायो/तांमा/COVID-19//२०२० दि.२१/०३/२०२०.

२) शासनाचे पत्र क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५/सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय, मुंबई दि.२४ मार्च, २०२०.

३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/जिवायो/तांमा/COVID-19//२०२० दि.२९/०५/२०२०.

४) Letter D.O.No.S.१६०३०/१८/२०१९-NAM dated ०६th March, २०२० received from Vaidya Rajesh Kotecha, Secretary, GOI, Ministry of AYUSH, New Delhi.

५) शासन निर्णय क्र.आयुसे-०५२०/प्र.क्र.३३/आयु-१ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०८ जून २०२०.

उपरोक्त विषयीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये जिल्हास्तरावर जिल्हा वार्षिक योजना, राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत आपत्ती प्रतिसाद निधी विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांचेकडून जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरच्या अनुदानातून स्थानिक स्तरावर करण्यात येणा-या औषधी खरेदीसाठी तांत्रिक मान्यता देण्याची प्रक्रिया जलद गतीने होण्याच्या दृष्टीने संदर्भिय परिपत्रकान्वये जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. गठीत समितीच्या मान्यतेने व शिफारशीनुसार खरेदी करण्याबाबत संदर्भिय क्र.३ च्या परिपत्रकान्वये दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत जिल्हास्तरावर अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

तथापि, संदर्भ क्र.२ शासनाच्या दि.२४ मार्च, २०२० रोजीच्या पत्रान्वये राज्यात कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचारांसाठी वैद्यकीय साहित्य व उपकरणे यांची तातडीने खरेदी करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर खरेदी प्रक्रिया पत्रात नमूद मार्गदर्शक सुचनांनुसार करणेबाबत सर्व जिल्हयांना निर्देशित करण्यात आलेले आहे.

(कृ.मा.प.)

Scanned with CamScanner

संदर्भ क्र.४ अन्वये आयुष मंत्रालयाने कोविड-१९ या साथीच्या रोगाकरिता आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी औषधांबाबत नियमावली वितरीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या साथीच्या रोगाकरिता आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी विषयक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयान्वये "टास्क फोर्स ऑन आयुष फॉर कोविड-१९" या समितीने कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाय योजना तसेच अलाक्षणिक रुग्णांसाठी आयुष औषधींच्या वापराबाबत मार्गदर्शक सुचनांच्या अंमलबजावणीस शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

करिता जिल्हास्तरावर उपलब्ध स्थानिक निधीमधून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या मान्यतेने व शिफारसीनुसार COVID-१९ संबंधित आयुष औषधे जिल्हास्तरावर खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, सदर समितीने सदरची आयुष औषधी आयुष मंत्रालयाच्या नियमावलीप्रमाणे प्रमाणित व योग्य असल्याची खात्री करावी व खरेदी प्रक्रिया राबवितांना उपरोक्त संदर्भीय क्र.१ ते ५ च्या पत्र व शासन निर्णयामध्ये नमूद मार्गदर्शक सुचनांनुसार करावी.

(डॉ. अनूप कुमार यादव)
आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई

प्रत माहितीस्तवः-

१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, .......................... (सर्व)

प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तवः-

जिल्हा आयुष अधिकारी/सहा. जिल्हा आयुष अधिकारी (सर्व)



Scanned with CamScanner